International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.6 July – Aug 2022

# बीड जिल्हयातील शेती आणि उद्योग एक चिकित्सक अभ्यास

**विवेक तात्यासाहेब जेवे**
स. प. महाविद्यालय पुणे, ४११०३०

DOI - 10.5281/zenodo.14545610

**प्रस्तावना:**

बीड जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा भागातील महत्त्वाचा जिल्हा आहे. बीड जिल्हा दुष्काळ प्रवण क्षेत्र म्हणून ओळखला जातो. अपुऱ्या पावसामुळे शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होतो तरीही या जिल्ह्याची संस्कृती आणि ऐतिहासिक वारसा यामुळे जिल्ह्याला एक वेगळी ओळख आहे. अकरा तालुक्यांचा या जिल्ह्याची लोकसंख्या 2011 च्या जनगणनेनुसार 25 लाख एवढी आहे. बीड जिल्ह्याच्या अर्थव्यवस्था ही मुख्यतः शेतीवर आधारित आहे या भागात प्रामुख्याने कोरडवाहू शेती केली जाते तसेच कापूस,सोयाबीन, तूर, ज्वारी ,बाजरी यासारख्या पिकाची लागवड होते मात्र कमी पावसाचे प्रमाण, वारंवार येणारा दुष्काळ आणि सिंचनाच्या सुविधांचा अभाव यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.

बीड जिल्हा शेती सोबतच उद्योगांमध्येही थोड्याफार प्रमाणात विकसित होत आहे या जिल्ह्यांमध्ये लघुउद्योग आणि मध्यम उद्योग त्याचबरोबर अन्नप्रक्रिया उद्योग वीट भट्टी यांसारखे व्यवसाय येथे कार्यरत आहेत स्थानिक स्तरावर रोजगार निर्मिती , आर्थिक विकास आणि शेती व उद्योगांचा परस्पर संबंध लक्षात घेऊन या दोन क्षेत्राचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे

या अभ्यासाचा उद्देश बीड जिल्ह्यातील शेती व उद्योग क्षेत्रातील स्थिती चा अभ्यास करणे हा आहे. त्याचबरोबर शेती आणि उद्योगासाठी गरजेचे असणाऱ्या विविध सुधारणा याचा अभ्यास करणे.

**बीड जिल्ह्यातील शेतीचा अभ्यास:**

बीड जिल्हा मराठवाडा विभागातील महत्त्वाचा भाग असून बीड चे अर्थव्यवस्थ प्रामुख्याने आपल्याला शेतीवर आधारित असलेले दिसून येते येथील शेतकऱ्यांना नैसर्गिक संकटे अनियमित पाऊस यांसारखे आव्हानांचा सामना करावा लागतो.

**जमीन व हवामान:** दुष्काळग्रस्त भाग ओळखला जातो जिल्ह्यामध्ये पावसाचे प्रमाण हे सारखे कमी जास्त होत असल्याने येथील शेतकऱ्यांना याचा मोठ्या प्रमाणात फटका बसतो येथील हवामान हे कोरडे आणी उष्ण आहे तर उन्हाळ्यात येथील तापमान 40 ते 45 डिग्री पर्यंत जाते. पावसाचे सरासरी प्रमाण हे वार्षिक 600 ते 800 मिमी एवढे आहे. पाऊस हा अनियमित असल्याने खरीप

हंगामात मोठ्या अडचणी या ठिकाणी येतात सतत पडणारा दुष्काळ ही या जिल्ह्याची सगळयात महत्त्वाची समस्या आहे. येथील जमीन मुरमाड आणि काळी आहे. काळी माती ही कापूस व तूर या पिकांसाठी उपयुक्त आहे तर मुरमाड माती ही ज्वारी व बाजरी साठी उपयुक्त आहे.

**मुख्य पिके:** बीड जिल्ह्यातील शेती पावसाच्या अनियमिततेवर आधारित आहे. त्यामुळे तेथे प्रामुख्याने कोरडवाहू पिके घेतली जातात. खरीप आणि रब्बी हंगामात विविध प्रकारचे पिके घेतली जात असून त्याची उत्पादकता मातीचा प्रकार हवामान आणि साधणांच्या उपलब्धतेवर अवलंबून असतात.

खरीप हंगामातील पिके खरीप हंगाम प्रामुख्याने जून ते ऑक्टोबर या कालावधीत असतो त्यामध्ये कापूस सोयाबीन तूर उडीद मूग यांसारखी पिके घेतली जातात. तर उन्हाळी हंगामामध्ये भाजीपाला व फळझाडे यांची पिक घेतली जाते त्यामध्ये टोमॅटो मिरची कांदा यांसारखे भाजीपाला व डाळिंब पपई आणि संत्री यांसारख्या फळझाडांची लागवड केली जाते आणि काही भागांमध्ये उसाच्या लागवडीसाठी पाणी उपलब्ध आहे तेथे ऊस लागवड करतात.

**शेतीतील आव्हाने:**

अनियमित पाऊस आणि सतत दुष्काळ- बीड जिल्हा हा कायम दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून संपूर्ण महाराष्ट्रभर परिचित आहे येथे प्रामुख्याने 600 ते 800 मि मी वार्षिक एवढा पाऊस होतो. येथील पावसाचे प्रमाण हे कमी आणि असमान असल्यामुळे येथे शेतकऱ्याना शेतीच्या समस्यांचा मोठ्या प्रमाणात सामना करावा लागतो.

- जिल्ह्यात पाण्याचा तुटवडा असल्या सोबतच येथे सिंचनाच्या सुविधाही अपुरे आहेत.
- बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचाही वापर शेतीमध्ये झाला पाहिजे अशा प्रकारे तंत्रज्ञानाचा अभाव हा येथील शेतीमध्ये दिसून येतो व शेतकरी पारंपारिक शेती करत असल्याचे चित्र या ठिकाणी दिसते
- त्याचप्रमाणे बहुतांश शेतकरी हा हा कर्जाच्या ओझ्याखाली असल्याचे दिसते त्यामुळे येथील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाणही जास्त आहे  शेतकऱ्यांना वेळेवर आर्थिक मदत उपलब्ध होत नाहीत त्यामुळे ही समस्या महत्त्वाची आहे
- कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या ठिकाणी होणे आवश्यक आहे
- सततच्या पिकाच्या लागवडीमुळे जमिनीतील पोषणत्वाची कमतरता निर्माण झाली आहे
- सरकारी योजना - प्रधानमंत्री पिक विमा योजना, मनरेगा आणि दुष्काळ निवारण योजना या योजनेमुळे काही प्रमाणात मदत झाली आहे परंतु ती मदत पुरेशी नाहीये.

**शेतीमध्ये असणाऱ्या समस्या वरील उपाय योजना**:

बीड जिल्ह्यातील शेती मुख्यतः नैसर्गिक संसाधने आणि पर्जन्य व अवलंबून आहे. शेतीतील

समस्या सोडवण्यासाठी तांत्रिक आर्थिक आणि धोरणात्मक उपाययोजना आवश्यक आहे.

**जल व्यवस्थापन:**

- जलसंधारणासाठी शेतकरी केंद्र बंदरे आणि चेगडे महत्त्वाचे आहे.
- पांनलोट क्षेत्र विकास योजना प्रभावी पणे राबवने महत्त्वाचे आहे.
- शेतकऱ्यांना ठिबक सिंचन तुषार सिंचन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी अनुदान देणे महत्त्वाचे आहे त्याचबरोबर कमी पाण्यात जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी आधुनिक सिंचन तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे.

**पीक व्यवस्थापन:**

पाणी कमी लागणारे पिकांवर भर देणे जसं की ज्वारी बाजरी तूर हरभरा तृणधान्य आणि दहन यांचे मिक्स पिक पद्धतीचा अवलंब करणे.

- रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर कमी करणे व सेंद्रिय खतांचा वापर करून सेंद्रिय शेतीचे फायदे शेतकऱ्यांना पटवून देणे.
- रोग कीड व्यवस्थापनासाठी जैविक उपाययोजनांचा प्रचार करने.
- शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अजून प्रभावीपणे वापर करणे.
- शेतकऱ्यांना सहज व सुलभ कर्ज उपलब्ध होऊन त्याचे व्याजदर कमी असणे.
- शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान व्यवस्थापन पीक संरक्षण या सर्वांवर प्रशिक्षण देणे त्याचबरोबर शेतकरी मेळावे कृषी प्रदर्शन यांचे आयोजन करणे.
- स्थानिक हवामानाशी सुसंगत पारंपारिक बियाणे व पिकाचे संवर्धन करून मृदा चाचणी प्रयोगशाळा उभारून मृदा आरोग्य तपासणी करणे.
- प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना त्याचबरोबर जलयुक्त शिवार योजना यांसारख्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून अनुदान आणि सवलती वेळेवर पोहोचवणे.

**बीड जिल्ह्यातील उद्योगांचा अभ्यास:**

बीड जिल्ह्यातील अर्थव्यवस्था मुख्यतः शेतीवर आधारित असले तरी काही प्रमाणात उद्योगधंद्यांची वाढ येथे होताना दिसत आहे जिल्ह्यामध्ये औद्योगिक विकास तुलनेने कमी आहे परंतु स्थानिक संसाधनावर आधारित लघु उद्योग आणि सेवा उद्योगांचा विकास जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावतात.

१) **कृषीवर आधारित उद्योग:** जिल्ह्यामध्ये काही प्रमुख साखर कारखाने आहेत तेथील उत्पादक शेतकऱ्यांना स्थिर बाजारपेठ मिळून रोजगारांना रोजगार संधी मिळते त्याचबरोबर सोयाबीन आणि यासारख्या तेलबियांवर प्रक्रिया करणाऱ्या गिरण्या देखील कार्यरत आहेत. तुर मूग हरभरा यांसारख्या पिकांवर प्रक्रिया करणारे डाळ वीर उद्योग जिल्ह्यात काही प्रमाणात आहेत.

**२) लघु लघुउद्योग:** जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी हातमाग व यंत्र उद्योग आधारे कापड उत्पादन करून

कापड विणकाम उद्योग यातून स्थानिक महिलांना रोजगाराची संधी प्राप्त झाले आहे त्याचबरोबर विणकाम सुधारकांवर काम आणि मातीच्या वस्तू तयार करणे यांसारखी पारंपारिक उद्योगी येथे आहेत.

**३) सेवा उद्योग:** वाहतूक आणि लॉजिस्टिक्स मराठवाडा विभागात मध्यभागी असलेला जिल्हा म्हणून बीडची ओळख असल्याने येथे मालवाहतूक आणि लॉजिस्टिक उद्योग हा विकसित होत आहे त्याचबरोबर परळी वैजनाथ मंदिरामुळे जिल्ह्यात धार्मिक पर्यटनाचा चालना मिळत आहे धर्मशाळा हॉस्टेल्स आणि वाहतूक व्यवसायातून आर्थिक पर्यटनामुळे फायदा येथील उद्योजकांना होत आहे.

**४) बांधकाम उद्योग:** वीट भट्टी सिमेंट ब्लॉक निर्मिती लोखंडी साहित्य यांचा व्यवसाय यांसारखी व्यवसाय बांधकाम उद्योगास पूरक व्यवसाय या ठिकाणी केले जातात जिल्ह्यातील वाढत्या नागरिकांमुळे बांधकामाचे निगडित उद्योगांना इकडे मागणी आहे.

- त्याचबरोबर मत्स्यपालन व पशुपालन उद्योग हा येथे मोठ्या प्रमाणावर लोक करतात त्यावर आधारित प्रक्रिया उद्योग तसेच गोबर गोमूत्र उत्पादन यांसारखे उद्योग केले जातात.
- दुग्ध व्यवसाय दुग्ध शाळा व सहकारी संघ कार्यरत आहेत दुधावर आधारित पदार्थ बनवणे याची उद्योग या ठिकाणी होतात.
- जिल्ह्यातील औषधी वनस्पती नैसर्गिक संसाधनावर आधारित उद्योग यामध्ये हरबल उत्पादने आणि आयुर्वेदिक औषध निर्मिती केली जातात.
- डाळिंब पैकी यांचे उद्योग येथे नव्याने निर्माण होत आहेत.
- परळी ते थर्मल पावर प्लांट निर्मितीला चालना देतो हा उभा आहे त्याचप्रमाणे सौर ऊर्जावर ऊर्जा प्रकल्प हळूहळू विस्तारित होत आहेत.

**उद्योगांसाठी सुधारणा आणि उपाय:**

१) पायाभूत सुविधांचा विकास-सर्वप्रथम बीड जिल्ह्यामध्ये हे ग्रामीण भागात जाणारे रस्ते हे उत्कृष्ट असले पाहिजे त्याचबरोबर वाहतुकीची व्यवस्था ही व्यवस्थित असली पाहिजे औद्योगिक क्षेत्राची जोडण्यात रस्ते विकसित करणे हे महत्त्वाचे धोरण असले पाहिजे त्याचबरोबर रेल्वे आणि लॉजिस्टिक सारखे नेटवर्कचा विस्तार झाला पाहिजे

२) ग्रामीण भागामध्ये वीज पुरवठा ही एक मोठी समस्या आहे त्यामुळे सतत वीज पुरवठा करण्यात आला पाहिजे त्याचबरोबर सौर व पवन ऊर्जा प्रकारांमध्ये गुंतवणूक वाढवली पाहिजे

३) जिल्ह्यातील अजून एक महत्त्वाची समस्या म्हणजे पाणीपुरवठा औद्योगिक वसासाठी स्वतंत्र जलस्रोत व जलसंवर्धन प्रकल्प त्या ठिकाणी झाले पाहिजे

**औद्योगिक धोरणांमध्ये सुधारणा:**

१) बीड जिल्ह्याला औद्योगिक दृष्ट्या मागास क्षेत्र म्हणून घोषित करून विशेषत सवलती दिल्या पाहिजेत जेणेकरून गुंतवणूकदार आकर्षित होतील त्याचबरोबर मोठ्या उद्योगांसाठी सवलतीचे कर्ज आणि उपलब्ध करणे हे देखील महत्त्वाचे आहे.

२) मध्यम उद्योग त्याचबरोबर स्थानिक लघुउद्योग यांना प्रोत्साहन देण्यासाठी सबसिडी आणि सवलती उपलब्ध करणे.

- स्थानिक तरुणांना उद्योगासाठी आवश्यक कौशल्य शिकवणारे प्रशिक्षण केंद्र जिल्ह्याच्या ठिकाणी उघडून त्यांना प्रशिक्षण देणे व औद्योगिक क्षेत्रातील नवे तंत्रज्ञान आत्मसात करण्यावर भर देणे
- महिलांसाठी विशेष उद्योग योजना आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करून महिलांना उद्योग क्षेत्रात प्रसाद देणे त्याचबरोबर हस्तकला विनकामाने अन्नप्रक्रिया उद्योगात महिलांचा सहभाग

**स्थानिक संसाधनांचा प्रभावी वापर:**

१) कृषी क्षेत्रावरील आधारित उद्योग - डाळिंब सोयाबीन यांसारख्या पिकावर आधारित उद्योग सुरू करणे औषध वनस्पती यांवर प्रक्रिया देणारे उद्योग तयार करणे

२) दुग्ध शाळा आणि दूध उत्पादन तयार करणाऱ्या उद्योगांना प्रोत्सांहन देणे.

**शेतीवर उद्योग क्षेत्राचा परिसर संबंध:**

१) शेती व उद्योग या सोबत चालणाऱ्या गोष्टी आहेत बऱ्याच उद्योगांमध्ये शेतीतील उत्पादन हे त्यांचे रॉ मटेरियल असते त्यामुळे शेतीवरील आधारित उद्योगांची बरबाद झाल्यास शेती उत्पादनाही बाजारपेठ उपलब्ध होईल.

२) उद्योग क्षेत्राचा विकास झाल्यास शेतकऱ्यांच्या पुरक रोजगाराची गरज पूर्ण होईल.

**निष्कर्ष:**

बीड जिल्ह्याचा शेती आणि उद्योग यांचा चिकित्सक अभ्यास केल्यानंतर असे स्पष्ट होते की, हा जिल्हा प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहे, परंतु शेतीशी निगडित अडचणी आणि उद्योग क्षेत्राच्या मर्यादा यामुळे येथील विकास संथ गतीने होत आहे. बीड हा दुष्काळप्रवण जिल्हा असून, पावसाच्या अनियमिततेमुळे शेतीला अनेक अडथळयांना सामोरे जावे लागते. अपुऱ्या पावसामुळे सिंचनाची सुविधा तोकडी आहे आणि शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक तेवढे पाणीही मिळत नाही. येथील बहुतांश शेती कोरडवाहू असल्याने उत्पादकता कमी असून, शेतकऱ्यांना दरवर्षी निसर्गाच्या लहरींवर अवलंबून रहावे लागते. मातीचा पोत राखण्यासाठी सेंद्रिय शेतीचा अवलंब करणे आवश्यक आहे, परंतु अनेक शेतकरी अद्याप पारंपरिक पद्धतीने शेती करत आहेत, त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा पुरेसा वापर होत नाही. या समस्या सोडवण्यासाठी जल व्यवस्थापन, ठिबक सिंचन, तुषार सिंचन, तसेच जलसंधारणाच्या पद्धती प्रभावीपणे राबवणे गरजेचे आहे.

जिल्ह्यातील शेतकरी सातत्याने कर्जबाजारी होत असल्याचे चित्र आहे. अपुऱ्या पिकांमुळे त्यांचे कर्ज फेडणे कठीण होते, ज्यामुळे अनेक शेतकरी मानसिक तणावाखाली येतात. शेतीशी निगडित समस्या सोडवण्यासाठी सरकारने जसे प्रधानमंत्री पीक विमा योजना, मनरेगा, जलयुक्त शिवार योजना यांसारख्या विविध योजना राबवल्या आहेत, मात्र त्या योजनांचा लाभ वेळेवर मिळत नाही किंवा पुरेसा नसतो. शेतकऱ्यांना त्यांच्या

समस्या सोडवण्यासाठी वेळेवर कर्ज उपलब्ध करून देणे, प्रशिक्षण देऊन आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्यास प्रवृत्त करणे, आणि त्यांच्या उत्पादनांसाठी बाजारपेठ निर्माण करणे महत्त्वाचे ठरते.

औद्योगिक क्षेत्रातही बीड जिल्ह्याला अनेक मर्यादा आहेत. जिल्ह्यातील उद्योग प्रामुख्याने शेतीवर आधारित आहेत, ज्यात साखर कारखाने, डाळ गिरण्या, तेलबिया प्रक्रिया उद्योग यांचा समावेश होतो. लघुउद्योग व हस्तकला व्यवसायांतून स्थानिकांना रोजगार मिळत असला, तरी औद्योगिक विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधा अद्याप अपुऱ्या आहेत. रस्त्यांची खराब स्थिती, अपुरा वीजपुरवठा, आणि जलस्रोतांची कमतरता यामुळे मोठ्या उद्योगधंद्यांसाठी हा जिल्हा अद्यापही मागे आहे. स्थानिक उद्योगांना चालना देण्यासाठी जिल्ह्यातील संसाधनांचा अधिक चांगल्या पद्धतीने उपयोग करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, डाळिंब, सोयाबीन, आणि औषधी वनस्पती यावर आधारित प्रक्रिया उद्योग सुरू केल्यास जिल्ह्यातील कृषी आणि उद्योग क्षेत्र अधिक बलवान होईल.

औद्योगिक क्षेत्राच्या प्रगतीसाठी पायाभूत सुविधांचा विकास करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यात ग्रामीण रस्त्यांचे जाळे सुधारणे, रेल्वे आणि वाहतुकीचे मजबूत नेटवर्क उभारणे, आणि सातत्यपूर्ण वीजपुरवठा यांचा समावेश आहे. याशिवाय, सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जा प्रकल्पांना चालना देणे जिल्ह्याला दीर्घकालीन फायदा देऊ शकते. स्थानिक तरुणांना कौशल्य विकास केंद्रांद्वारे औद्योगिक तंत्रज्ञान शिकवणे, महिलांसाठी विशेष उद्योग योजना सुरू करणे, आणि हस्तकलेला प्रोत्साहन देऊन रोजगारनिर्मिती करणे यावर भर दिला पाहिजे.

बीड जिल्ह्याच्या आर्थिक विकासासाठी शेती आणि उद्योग क्षेत्राचा समतोल राखणे अत्यंत गरजेचे आहे. शेतीवरील आधारित उद्योग सुरू केल्यास शेतकऱ्यांना त्यांच्यासाठी स्थिर बाजारपेठ मिळेल आणि उद्योगांना कच्चा माल सहज उपलब्ध होईल. यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पूरक रोजगार मिळेल आणि त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. शेती आणि उद्योग यांचा परस्परपूरक विकास जिल्ह्याला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवू शकतो.

सरकार, स्थानिक प्रशासन, शेतकरी, उद्योजक, आणि नागरीक यांनी एकत्रित प्रयत्न करून बीड जिल्ह्याचा विकास साधायला हवा. योग्य नियोजन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, आणि सरकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास बीड जिल्हा शेती व उद्योग क्षेत्रात प्रगती साधू शकतो. एकात्मिक विकास धोरणांद्वारे या जिल्ह्याला दुष्काळमुक्त आणि समृद्ध बनवण्याचे ध्येय गाठता येईल.

**संदर्भ:**


१) महाराष्ट्र शासन उद्योग विभागाचे वार्षिक अहवाल
२) मराठी मराठवाडा औद्योगिक विकास महामंडळ ची माहिती पुस्तिका
३) मराठवाडा विभागातील उद्योग व शेती यावर आधारित संशोधन लेख
४) बीड जिल्ह्याचा वार्षिक विकास अहवाल
५) कृषी विज्ञान केंद्र बीड व मराठवाडा विकास मंडळाचे अहवाल.